# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२५**

**सन २०२४-२५ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**गुरुवार, दिनांक ६ मार्च, २०२५**

**सार्वजनिक बांधकाम विभाग**

**कपात सूचनांची एकूण संख्या – ९**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१६, गृहनिर्माण**<br>**बाब क्रमांक: ४६, रूपये:- ४५,३४,९१,०००/-**<br>**श्री. संजय देरकर** |
| (१) | ११० | १०० | यवतमाळ जिल्ह्यातील वणी मतदार संघातील वणी हे महत्वाचे औद्योगिक शहर असून सी.पी. अँड बेरार प्रांतामध्ये वणी हे जिल्ह्याचे ठिकाण असणे, वणी शहराच्या सभोवताली कोळसा खाणी व सिमेंट कारखाने मोठ्या प्रमाणात असणे, तसेच वणी तालुक्याची सीमा तेलंगाना राज्याला व चंद्रपूर जिल्ह्याला जोडलेली असून येथे नेहमी उच्च पदस्त अधिकारी, अति महत्वाचे व्यक्ती यांची वर्दळ असते. सद्यस्थितीला वणी येथील शासकीय विश्राम गृह मोडकळीस आलेले असून दूरावस्था झालेली असणे, वणी येथे अद्यावत शासकीय विश्राम गृह बांधण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींकडून करण्यात आलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-६**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०५९, सार्वजनिक बांधकामे**<br>**बाब क्रमांक: ४९, रूपये:- १,०००/-**<br>**श्री. बाबासाहेब देशमुख** |
| (२) | ११२ | १० | राज्यातील विविध ठिकाणी असलेल्या शासकीय कार्यालयीन इमारतींचे परीक्षण व दुरूस्तीसाठी अतिरिक्त निधीची तरतूद करण्यात आली आहे. परंतु ता.सांगोला जि.सोलापूर मधील तहसील कार्यालयात उप विभागीय अधिकारी कार्यालय, सर्व तलाठी कार्यालये ही नादुरुस्त व आपुऱ्या जागेअभावी कार्यालयात येणाऱ्या नागरिकांसाठी गैरसोयीची असल्याने सदर कार्यालयांच्या इमारतीच्या दुरूस्ती व बांधकामासाठी प्रशासकीय मान्यता देऊन निधीची तरतूद करण्यात यावी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. संजय मेश्राम** |
| (३) | ९९ | १० | शासकीय विश्राम गृह कुही, शासकीय विश्राम गृह उमरेड, शासकीय विश्राम गृह भिवापूर, जिल्हा नागपूर येथील विश्राम गृहांची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून सदर ठिकाणी दुरुस्ती किंवा नूतनीकरण न केल्यामुळे लोकप्रतिनिधी तसेच शासकीय अधिकारी, कर्मचारी तसेच अभ्यांगत यांना प्रचंड गैरसोईचा सामना करावा लागतो, त्यामुळे शासनाने तातडीने उपरोक्त ठिकाणी सर्व शासकीय विश्राम गृह नूतनीकरणासाठी निधीची तरतूद करण्याबाबत तसेच त्या ठिकाणावरील रिक्त असलेल्या पदांवर कर्मचारी यांची नियुक्ती करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-६**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१७, नगरविकास**<br>**बाब क्रमांक: ५१, रूपये:- १,०००/-**<br>**श्री. अजय चौधरी** |
| (४) | ९२ | १० | शिवडी बी.डी.डी. चाळींच्या गच्चीवर पावसाळी पाणी गळती रोखण्याकरिता उपाययोजना म्हणून शालीमार लावण्याची प्रक्रिया करणे आवश्यक आहे. परंतु गेले २ ते ३ वर्षे पावसाळी पाणी गळती रोखण्याकरिता शालीमार लावण्याची प्रक्रिया केलेली नाही. त्यामुळे बी.डी.डी. चाळीतील रहिवाशांना नाहक त्रास सहन करावा लागणे, शालीमार लावण्यासंदर्भात प्रस्ताव तयार केला असून निधीअभावी सदर प्रस्ताव प्रलंबित असणे, तरी शिवडी बीडीडी चाळींच्या गच्चीवर पावसाळी पाणी गळती रोखण्याकरिता शालीमार लावण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०५४, मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: ५२, रूपये:- १,०००/-**<br>**श्री. अमिन पटेल** |
| (५) | ९३ | १० | राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ मुंबई गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे मागील बऱ्याच वर्षांपासून सुरु असणे सदर महामार्ग कोकणातील तीन जिल्हे जोडणारा एकमेव महामार्ग असणे, आजमितीपर्यंत सदर रस्त्यावर खड्डे, पुलांची अर्धवट असलेली कामे, सर्व्हिस रोड त्याचप्रमाणे रस्त्याच्या दुतर्फा संरक्षक कुंपण, गटार लाईन आदी कामे अपूर्ण अवस्थेत असणे, शासनाच्या वतीने कंत्राटदाराला वेळोवेळी देण्यात आलेल्या डेडलाईन पूर्ण होणे, सदर मार्गावरील काही ठिकाणी रस्त्यावरील मातीमुळे अपघातांचे देखील प्रमाण वाढत असणे, सदर |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | महामार्गाच्या कामाचा दर्जा निकृष्ट असणे, रस्त्याच्या दुतर्फा झाडांची लागवड न होणे, परिणामी स्थानिक नागरिकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागणे, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०५४, मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: ५३, रूपये:- १,०००/-**<br>**श्री. अमित झनक** |
| (६) | ११५ | १० | वाशिम जिल्हयातील शिरपूर जैन हे जगभरातील जैन भक्तांची काशी म्हणून प्रसिध्द असलेल्या ठिकाणी जाण्यासाठी मुख्य रस्त्याची व बायपास रस्त्याची अत्यंत दुरावस्था असल्यामुळे याठिकाणी येणाऱ्या जैन धर्मिय बांधवाना अत्यंत त्रासदायक होत असल्याने या मुख्य रस्त्याच्या बायपास रोड साठी निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी होत असून याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (७) | ११६ | १० | वाशिम जिल्हयातील रिसोड येथील कुकसा, मांगूळ झनक, गोभणी, महागाव व सोनारी लेणी, वडजी, मसलापेण, बिलखेड, रिळद या महत्त्वाच्या रस्त्यांची दुरावस्था झाली असून या रस्त्यांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याची नितांत आवश्यकता व याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-८**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४०५९, सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: ५५, रूपये:- १,०००/-**<br>**श्री. बाबासाहेब देशमुख** |
| (८) | ११४ | १० | अलिबाग जि.रायगड येथील अलिबाग बस स्थानकाच्या नूतनीकरणाच्या कामास प्रशासकीय मान्यता देऊन दि.28 ऑगस्ट 2019 रोजी भूमिपूजन समारंभ कार्यक्रम ही करण्यात आला परंतु अद्याप सदर बस स्थानकाचे काम सुरू न झाल्याने प्रवाश्यांची गैरसोय होत आहे, तरी अलिबाग बस स्थानकाचे नूतनीकरण करण्यासाठी प्रशासकीय मंजूरी देऊन निधीची तरतूद करण्याबाबत करावयाची शासनाने कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (९) | १२४ | १० | सांगोला जि.सोलापूर येथील सांगोला बस स्थानकाची अवस्था दयनीय झाली असून सभोवतालच्या परिसराचे सुशोभीकरण करणे अत्यंत महत्वाचे आहे. याठिकाणी प्रवाश्यांना बसण्याकरिता योग्य आसन व्यवस्था नसल्याने नागरिकांना त्याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. तरी सांगोला बस स्थानक व सभोवतालच्या परिसराचे सुशोभीकरण करण्याकरिता प्रशासकीय मान्यता देऊन निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : ५ मार्च, २०२५**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) सार्वजनिक बांधकाम विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई